

दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com
■ दैनिक ■ धाराशिव
■ अंक 136 ■ वर्ष 2 रे
■ मंगळवार , दि. 8 जुलै 2025
■ RNI NO -2023/90078
■ पाने 04 ■ किंमत रू 5

खरीप हंगामात सोयाबीन पिकाची जोमदार वाढ होत असून, शेतकऱ्यांच्या परिश्रमांना हिरवळलेल्या शिवारात भरघोस उत्पादनाची आशा निर्माण झाली आहे. यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीन पिकाची स्थिती समाधानकारक असली तरी अनेक भागात पिकांना पावसाची प्रतीक्षा आहे. सुरुवातीच्या काळात पाऊसमान अनुकूल राहिल्याने आणि वेळेवर झालेल्या पेरण्यांमुळे पीक जोमात आहे.वरवंटी शिवारात आरिफ शेख यांनी घेतलेले छायाचित्र.

# कृत्रिम फुलांमुळे मोडले जिल्ह्यातील ९० एकरावरील जरबेराचे मळे, कृत्रिमची सजावट संपल्यास फुलशेतीचा पुन्हा दरवळ

## आमदार कैलास पाटील यांची सभागृहात लक्षवेधी,सरकारचे आश्वासन, चालू अधिवेशनातच बंदीचा निर्णय घेणार

आरंभ मराठी | धाराशिव



**प्रत्येक समारंभात कृत्रिम फुलांचा सर्रास वापर सुरू झाल्याने शेतकऱ्यांची फुलशेती धोक्यात आली आहे. २० वर्षांपूर्वी जिल्ह्यात जरबेरा फुलशेतीचा प्रयोग यशस्वी झाला. त्यानंतर शेतकऱ्यांनी सुमारे ९० एकरावर फुलवलेले जरबेरा फुलशेतीचे मळे कृत्रिम फुलांमुळे मोडीत निघाले. त्यामुळे जिल्ह्याच्या अर्थकारणाला ब्रेक लागला. शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान विचारात घेऊन आमदार महेश शिंदे, आमदार कैलास पाटील यांनी कृत्रिम फुलांवर बंदी घालण्याची मागणी विधानसभेत केली. त्यानंतर सरकारच्या वतीने मंत्री भरत गोगावले यांनी चालू अधिवेशनातच याबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.**

उपळा तसेच पाडोळी गावाने भरघोस उत्पन्न देणारे जरबेरा फुलांचे वाण नवी ओळख घेऊन जगासमोर आणले. ही ओळख सुमारे ३५ देशांत पोहोचली. मात्र, या वाणांची ओळख दिलेल्या उपळा, पाडोळी गावातून जरबेराचे पॉलीहाऊस नामशेष झाले आहेत. केवळ दोन गावात ५० ते ६० एकरावर असलेले पॉलिहाऊस आता ३ ते ५ एकर उरले आहेत.तर जिल्ह्यात ९० एकरावर असलेले पॉलीहाऊस १० एकरावर आले आहेत. त्यामुळे २०० हून अधिक शेतकऱ्यांची ४५ ते ५० कोटींची गुंतवणूक वाया गेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी सरकारकडे कृत्रिम फुलांना बंदी घालण्याची मागणी केली होती. या मागणीच्या अनुषंगाने धाराशिवचे आमदार कैलास पाटील यांनी सोमवारी विधानसभेत लक्षवेधीद्वारे मुद्दा उपस्थित केला.



महाराष्ट्रातील हजारो शेतकरी आपल्या शेतीमध्ये आधुनिक पद्धतींचा अवलंब करत पॉलिहाऊस व शेडनेटमध्ये जरबेरा व इतर फुलांचे उत्पादन घेत आहेत. यासाठी शेतकरी सरकारी योजनांच्या माध्यमातून, तसेच खासगी बँकांमधून लाखो रुपयांचे कर्ज घेतात. परंतु, सध्या बाजारात मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या कृत्रिम फुलांमुळे नैसर्गिक फुलांची मागणी घटली आहे, त्यामुळे या क्षेत्रात काम करणाऱ्या शेतकऱ्यांवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे. आमदार कैलास पाटील म्हणाले, कृत्रिम फुलांमुळे नैसर्गिक फुलांच्या शेतीचे नुकसान होत आहे. बाजारपेठ कोसळत आहे, शेतकरी आर्थिकदृष्ट्या कमकुवत होत आहेत. हे धोरणात्मक आहे तरी हे सभागृहच धोरण ठरवण्याचे ठिकाण आहे. त्यामुळे आता निर्णय घेण्याची वेळ आली आहे. अन्यथा शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर पोहोचतील. राज्यभरातील हजारो शेतकऱ्यांची आणि इतर लोकप्रतिनिधींचीही हीच मागणी आहे. सर्वांचे यावर एकमत असेल तर कृत्रिम फुलांवर बंदी घालण्यात अडचण काय आहे, असा सवाल आमदार कैलास पाटील यांनी विधानसभेत उपस्थित केला. आमदार पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर राज्याचे फलोत्पादनमंत्री भरत गोगावले यांनी सकारात्मक निर्णय घेऊन पर्यावरण मंत्री यांच्यासोबत अधिवेशन संपण्याअगोदर बैठक आयोजित करु. या बैठकीत योग्य निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देऊ, असे आश्वासन मंत्री गोगावले यांनी उत्तरादरम्यान दिले.

### शेतकऱ्यांवर कोट्यवधींचे कर्ज

धाराशिव जिल्ह्यात जरबेरा फुलशेतीला सोन्याचे दिवस आले होते.१० गुंठ्यासाठी फुलशेतीला १४ ते १५ लाख रूपये तर एकरी ६० लाख रूपये खर्च येतो. जिल्ह्यात ९० एकरवर फुलशेती उभारली. कृत्रिममुळे फुलांना उठाव आणि भाव नसल्यामुळे बँकांकडून घेतलेले शेतकऱ्यांचे कर्ज थकले आहे. बँकेच्या तगाद्याने शेतकरी हतबल झाले असून,त्यामुळे शासनाने बँकांना ऋण समाधान योजना राबविण्यासाठी सूचना द्याव्यात, अशी मागणी शेतकरी करत आहेत. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सरकारला वारंवार निवेदन दिण्यात आले.

### कोरोनापाठोपाठ कृत्रिममुळे शेतकऱ्यांची कोंडी

कोरोना काळात सार्वजनिक समारंभ, उत्सवावर निर्बंध आले होते.त्यामुळे दोन ते अडीच वर्षे जरबेरा फुलशेती प्रचंड तोट्यात आली.त्यानंतर प्रत्येक समारंभात नैसर्गिक फुलांऐवजी प्लास्टिकच्या कृत्रिम फुलांचा वापर होऊ लागला. ही फुले पुन्हा पुन्हा वापरता येतात. त्यामुळे नैसर्गिक फुलांचा वापर जवळपास संपुष्ठात आला आहे. परिणामी मागणी घटल्याने जरबेरा फुले उकिरड्यावर टाकून द्यावी लागत आहेत.त्यामुळे सरकारने कृत्रिम फुलांवर बंदी घातल्यास जरबेरा फुलशेतीला पुन्हा चांगले दिवस येऊ शकतात.

# विद्यार्थी-पालकांनी खेळातून लुटला आनंद

## गुंजेवाडीच्या शाळेत नवोपक्रम , आजोबा नातवाने पटकावला प्रथम क्रमांक

आरंभ मराठी | धाराशिव



विद्यार्थी आणि पालकांनी एकत्र नवनवे खेळ खेळून आनंदोत्सव साजरा केला. हा उपक्रम धाराशिव तालुक्यातील गुंजेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत घेण्यात आला .गुंजेवाडी येथे पालकांची सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभेमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी सांगोपांग चर्चा झाली. शाळेत नियमितपणे वेगवेगळे मनोरंजक व क्षमता वाढविणारे खेळ घेतले जातात. मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे मुलांचे खेळाकडे दुर्लक्ष होत आहे. त्याचा दुष्परिणाम त्यांच्या शरीरावर जाणवत आहे. मोबाईलच्या वापरामुळे कार्यक्षमता कमी होते .वेगवेगळ्या आजार लवकरच जडतात. विद्यार्थ्यांची शरीर प्रकृती चांगली राहावी, म्हणून त्यांना वेगवेगळ्या खेळांचा सराव दिला जातो.शाळेतील शिक्षक साईनाथ रुद्रके आरोग्य विषयक मार्गदर्शन करतात. आजचा खेळ हा विद्यार्थ्यांसाठी वेगळा होता. कारण ते आपल्या पालकांसोबत खेळ खेळणार होते. पालक सभेनंतर सर्व पालकांना व त्यांच्या पाल्यांना मैदानावर बोलावण्यात आले. खेळ असा होता की, पाण्याने भरलेल्या बादलीतून पालकांनी ग्लासमधून पाणी आणून अर्ध्यापर्यंत पाल्यांना द्यावे, तिथून पुढे पाल्यांनी पाणी घेऊन जावे व ते आपल्या बिसलेरीच्या बाटलीत भरावे. अशाप्रकारे ज्यांची बाटली अगोदर भरेल ती जोडी विजयी ठरेल. या गमतीशीर खेळात सर्व पालकांनी व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व मनमुराद आनंद लुटला.

या खेळात सर्वात वयस्कर असणारे गृहस्थ श्रीरंग हिप्परकर व त्यांचा नातू श्रेयश हिप्परकर या जोडीने प्रथम क्रमांक पटकावला . द्वितीय क्रमांक श्रुती जाधव व तिचे वडील विजय जाधव ,तर तृतीय क्रमांक शिव गेंड व त्याचे वडील युवराज गेंड या जोडीने पटकावला. क्रमांक येणे किंवा न येणे यापेक्षा सर्व पालकांनी व विद्यार्थ्यांनी मिळून मनमुराद आनंद लुटला हे मात्र खरे. सदर खेळाचे नियोजन व कार्यवाही श्री रुद्रके सर, श्री डोरले सर व चेतन धंगेगर यांनी केले. सदर खेळामध्ये व पालक सभेसाठी रंजीत हिप्परकर , आनंदा गेंड, श्रीरंग हिप्परकर, युवराज गेंड, विजय जाधव, बाबासाहेब चव्हाण, शिवाजी धंगेकर, भाऊसाहेब धंगेकर, सिद्धेश्वर धंगेकर ,कृष्णा रानगट, रामेश्वर गेंड इत्यादी पालक ,सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

# तुळजापूर आराखड्याबाबत पुजारी मंडळांसोबत आमदार राणा पाटील यांची सकारात्मक चर्चा



आरंभ मराठी | तुळजापूर

श्री तुळजाभवानी मंदिर आणि परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्यासंदर्भात धाराशिवमध्ये आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची पुजारी मंडळासोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत पुजारी मंडळाच्या विविध मागण्या, अडचणी आणि अपेक्षांवर चर्चा करण्यात आली.यावेळी पुजारी मंडळाच्या सर्व मागण्या, अडचणी आणि सूचना त्यांनी विस्ताराने लेखी स्वरूपात द्याव्यात, तसेच या मागण्या समजून घेत प्रशासनाकडून लेखी स्वरूपात उत्तर दिले जाईल, अशी चर्चा झाली. श्री तुळजाभवानी मंदिराच्या ऐतिहासिक व आध्यात्मिक महत्वाचा विचार करून या मंदिराचा विकास सर्वांच्या सहकार्याने,पारदर्शकतेने आणि सर्व परंपरांचे पालन करून व्हावा यासाठी आपण कटिबद्ध आहोत,असे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगीतले. या बैठकीस तिन्ही पुजारी मंडळ पाळीकर, भोपे, उपाध्ये मंडळाचे अध्यक्षासह माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, सज्ञनराव साळुंके, सचिन पाटील,प्रा.लोंढे, अंनत कोडो,नरेश अमृतराव,रत्नदिप भोसले,महेश चोपदार,संदीप गंगणे, राम चोपदार, लसणे, सुधीर कदम, संजय मैंदर्गी आदी बैठकीस उपस्थित होते. तिन्ही सर्व पुजारी मंडळ (पाळीकर,भोपे,उपाध्ये) तसेच पुजारी बांधवांनी बैठकीबाबत समाधान व्यक्त केले.

# धाराशिव रोटरी क्लबतर्फे अँटी रेबीज श्वान लसीकरण



आरंभ मराठी | धाराशिव

वर्ल्ड झुनोसीस डे व रेबीज लसीकरण दिन म्हणून साजरा करण्यात येतो. प्राण्यांकडून मानवांमध्ये होणाऱ्या विविध आजारांविषयी जनजागृती करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा असून, यानिमित्ताने धाराशिव रोटरी क्लबने पशुवैद्यकीय रूग्णालयात शहरी व ग्रामीण भागातील श्वानांना लसीकरण केले तसेच जनजागृती करण्यात आली. हे लसीकरण सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेस राबविण्यात आले. यामध्ये जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ.मनोज घाटे, सहायक आयुक्त डॉ. स्वप्निल जिंतपुरे, पशुधन विकास अधिकारी डॉ.कमलाकर शेळके,सहायक पशुधन विकास अधिकारी डॉ. विक्रम मगर तसेच कुकडे मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी धाराशिव रोटरी क्लबचे अध्यक्ष रणजित रणदिवे, सचिव प्रदीप खामकर,रो चित्रसेन राजेनिंबाळकर आदीउपस्थित होते.

# ऐतिहासिक पुनर्मिलनाचा क्षण

## ठाकरे बंधूंचे पुनर्मिलन: महाराष्ट्राच्या राजकारणातील नवे पर्व ..?

**५ जुलै २०२५** हा दिवस महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील एक महत्वाचा दिवस म्हणून गणला जाईल. तब्बल दोन दशकांनंतर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबईतील वरळी येथील 'एनएससीआय डोम'मध्ये एकाच मंचावर येऊन मराठी अस्मितेच्या रक्षणासाठी एकजुटीचे प्रदर्शन केले. 'आवाज मराठिचा' या विजय रॅलीच्या निमित्ताने हे पुनर्मिलन घडले, ज्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. मराठी भाषा आणि संस्कृतीच्या संरक्षणासाठी एकत्र आलेले ठाकरे बंधू भविष्यातील राजकीय रणनीतीत काय बदल घडवू शकतात? त्यांच्या या एकजुटीमुळे सामान्य मराठी माणसाला काय फायदा होईल आणि कोणती आव्हाने समोर येतील? या सगळ्या विषयांना आता तोंड फुटले आहे.

### एकत्र येण्याची कारणे

उद्धव आणि राज ठाकरे यांचे पुनर्मिलन ही केवळ भावनिक घटना नाही, तर त्यामागे खोल राजकीय आणि सामाजिक कारणे आहेत. सर्वप्रथम, महाराष्ट्र सरकारच्या त्रिभाषा धोरणाविरोधातील यशस्वी आंदोलनाने या दोघांना एका मंचावर आणले. राज्य सरकारने प्राथमिक शिक्षणात हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा प्रस्ताव मांडला होता, ज्याला मराठी भाषा आणि संस्कृतीवर आघात म्हणून पाहिले गेले. या धोरणाविरोधात उद्धव आणि राज यांनी एकत्रितपणे आवाज उठवला, आणि सरकारला हा प्रस्ताव मागे घ्यावा लागला. हा विजय मराठी अस्मितेचा प्रतीकात्मक विजय ठरला, ज्याने ठाकरे बंधूंना एकत्र येण्यासाठी एक सामाईक व्यासपीठ दिले.दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे बदलते राजकीय वास्तव. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला २०२२ मध्ये पक्षफुटीचा मोठा धक्का बसला, ज्यामुळे त्यांची राजकीय ताकद आणि प्रभाव कमी झाला. दुसरीकडे, राज ठाकरे यांच्या मनसेला गेल्या काही वर्षांत निवडणुकांमध्ये अपेक्षित यश मिळाले नाही. दोघांनाही आपापल्या पक्षाच्या मर्यादांची जाणीव झाली आहे, आणि मराठी माणसाच्या मतांचे विभाजन त्यांच्यासाठी घातक ठरत आहे. अशा परिस्थितीत, मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर एकत्र येणे हे त्यांच्यासाठी राजकीयदृष्ट्या फायदेशीर ठरू शकते.

तिसरे कारण आहे मराठी माणसाची भावनिक जोड. बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेली शिवसेना आणि त्यांचा मराठी अस्मितेचा वारसा हा दोन्ही नेत्यांच्या राजकारणाचा पाया आहे. मराठी माणसाच्या मनात ठाकरे कुटुंबाबद्दल आजही आदर आहे, आणि त्यांच्या एकत्र येण्याने ही भावनिक शक्ती पुन्हा एकदा जागृत होऊ शकते.देशाच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणात भाजपने घातलेला हैदोस हे देखील या पुनर्मिलनाचे एक महत्वाचे कारण आहे. सन २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत 'लाव रे तो व्हिडिओ' म्हणत राज ठाकरे यांनी भाजपविरोधात आक्रमक निशाणा साधला होता. पण राज यांच्या त्यानंतरच्या बदलत्या भूमिकांमूळे त्यांच्या चाहत्या वर्गात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. उद्धव मात्र भाजपशी थेट फारकत घेऊन त्यांच्या एकाधिकारशाहीशी, मतलबी राजकारणाविरुद्ध आक्रमकपणे लढत राहिले. त्रिभाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयाने दोन्ही ठाकरे बंधूंच्या मनातील भाजपविरोधी असंतोषाला एकत्रित वाचा फोडण्याचे निमित्त मिळाले.

### मागील राजकारण: दुरावा आणि मतभेद

उद्धव आणि राज ठाकरे यांचे राजकीय मार्ग २००५ मध्ये वेगळे झाले, जेव्हा राज यांनी शिवसेना सोडून २००६ मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) स्थापन केली. या फुटीमागे नेतृत्व आणि विचारधारेचे मतभेद होते. राज ठाकरे यांना शिवसेनेत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी पुरेशी संधी मिळत नसल्याची भावना होती, तर उद्धव ठाकरे यांना बाळासाहेबांचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी होती.

२००६ नंतर, दोघांनी स्वतंत्रपणे आपली राजकीय वाटचाल सुरू केली. उद्धव यांनी शिवसेनेचे नेतृत्व करताना २०१९ मध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत महाविकास आघाडी स्थापन करून सत्तेचा अनुभव घेतला, तर राज यांनी मनसेच्या माध्यमातून मराठी अस्मितेचा आणि स्थानिक हक्कांचा मुद्दा उचलला. मात्र, राज यांच्या मनसेला निवडणुकांमध्ये सातत्याने मर्यादित यश मिळाले, आणि त्यांचा प्रभाव प्रामुख्याने शहरी भागांपुरता मर्यादित राहिला.

या काळात दोघांनी एकमेकांवर टीका केली, आणि त्यांच्या समर्थकांमध्येही वैमनस्य निर्माण झाले. उद्धव यांनी शिवसेनेला अधिक समावेशक आणि राष्ट्रीय स्तरावरील राजकारणात सक्रिय करण्याचा प्रयत्न केला, तर राज यांनी मराठी माणसाच्या हक्कांसाठी आक्रमक भूमिका घेतली. या मतभेदांमुळे ठाकरे कुटुंबातील ही फ ूट मराठी जनतेच्या मनातही खटकत होती.

### राजकीय बदल: नव्या समीकरणांची नांदी

ठाकरे बंधूंच्या पुनर्मिलनामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठे बदल घडण्याची शक्यता आहे. सर्वप्रथम, शिवसेना (उबाठा) आणि मनसे यांच्यातील संभाव्य युतीमुळे मराठी मतांचे विभाजन थांबू शकते. याचा थेट परिणाम आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत, विशेषतः बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) निवडणुकीत दिसू शकतो. 'बीएमसी'वर शिवसेनेची दीर्घकाळ सत्ता होती, आणि उद्धव–राज यांच्या एकजुटीमुळे ही सत्ता पुन्हा मिळवण्याची शक्यता वाढली आहे.

दुसरे, महाविकास आघाडी (मविआ) च्या समीकरणांवर याचा परिणाम होऊ शकतो. उद्धव ठाकरे यांचा पक्ष काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत 'मविआ'चा भाग आहे, पण राज ठाकरे यांचा समावेश झाल्यास काँग्रेससारख्या पक्षांना आपली रणनीती पुन्हा आखावी लागेल. काही विश्लेषकांच्या मते, राज यांचा समावेश 'मविआ'ला अधिक आक्रमक आणि मराठी–केंद्रित स्वरूप देऊ शकतो, परंतु यामुळे काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षांशी मतभेदही निर्माण होऊ शकतात.

तिसरे, भारतीय जनता पक्ष (भाजप) आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला या एकजुटीमुळे आव्हान निर्माण होऊ शकते. ठाकरे बंधूंनी मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर भाजप आणि शिंदे गटावर आक्रमक टीका केली आहे, आणि यामुळे मराठी मतदारांमध्ये त्यांचा प्रभाव वाढू शकतो. विशेषतः, शिंदे गटाला मराठी माणसाच्या हक्कांसाठी कमी आक्रमक मानले जाते, ज्याचा फायदा ठाकरे बंधूंना मिळू शकतो.



### राज्यातील समस्या आणि आवश्यक धोरणे

महाराष्ट्रासमोर अनेक आव्हाने आहेत, ज्यांचा सामना करण्यासाठी ठाकरे बंधूंना ठोस धोरणे आखावी लागतील.

(१)मराठी भाषा आणि संस्कृतीचे संरक्षण: त्रिभाषा धोरणाच्या विरोधातून सुरू झालेल्या या एकजुटीने मराठी भाषेच्या संरक्षणाला प्राधान्य दिले आहे. यासाठी शालेय अभ्यासक्रमात मराठी भाषेला अनिवार्य करणे, मराठी साहित्य आणि कला यांना प्रोत्साहन देणे, आणि मराठी माध्यमाच्या शाळांना आर्थिक आणि पायाभूत सुविधांचा आधार देणे आवश्यक आहे.

(२) स्थानिक रोजगार आणि हक्क: मराठी माणसाला स्थानिक नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळावे, हा राज ठाकरे यांचा दीर्घकाळचा मुद्दा आहे. यासाठी औद्योगिक आणि सेवा क्षेत्रात स्थानिकांना आरक्षण, कौशल्य विकास कार्यक्रम, आणि बाहेरील राज्यांतील स्थलांतरितांच्या बाबतीत धोरणात्मक नियंत्रण आवश्यक आहे.

(३) पायाभूत सुविधा आणि शहरीकरण: मुंबई आणि इतर महानगरांमधील पायाभूत सुविधांचा अभाव, वाहतूक कोंडी, आणि पर्यावरणीय समस्यांवर उपाययोजना करणे गरजेचे आहे. 'बीएमसी'च्या माध्यमातून मुंबईच्या विकासासाठी ठोस योजना आखणे आणि त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

(४)शेती आणि ग्रामीण विकास: महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे प्रश्न, विशेषतः कर्जमुक्ती, पिक विमा, आणि बाजारपेठेतील सुधारणा, यावर लक्ष देणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी धोरणे आखावी लागतील.

### ठाकरे बंधूंची आजवरची मते

उद्धव आणि राज ठाकरे यांनी मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर नेहमीच आक्रमक भूमिका घेतली आहे, परंतु त्यांच्या दृष्टिकोनात काही फरक आहे. उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या नेतृत्वाखाली मराठी अस्मितेसोबतच राष्ट्रीय राजकारणात समावेशक दृष्टिकोन स्वीकारला. २०१९ मध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत युती करून त्यांनी सत्तेचा अनुभव घेतला, आणि मराठी माणसाच्या हक्कांसोबतच सामाजिक समावेशकतेवर भर दिला.

दुसरीकडे, राज ठाकरे यांनी मनसेच्या माध्यमातून मराठी माणसाच्या हक्कांसाठी अधिक आक्रमक आणि स्थानिक–केंद्रित दृष्टिकोन स्वीकारला. त्यांनी हिंदी भाषेच्या अनिवार्यतेचा आणि बाहेरील स्थलांतरितांचा मुद्दा वारंवार उचलला, ज्यामुळे त्यांना शहरी मराठी तरुणांमध्ये लोकप्रियता मिळाली, पण त्यांच्या पक्षाला व्यापक यश मिळाले नाही.

या पुनर्मिलनात दोघांनी मराठी अस्मितेच्या संरक्षणावर एकमत दर्शवले आहे. उद्धव यांनी ''आम्ही एकत्र राहण्यासाठी एकत्र आलो आहोत'' असे सांगून युतीचे संकेत दिले, तर राज यांनी हिंदीच्या अनिवार्यतेवर टीका करत मराठीच्या रक्षणाचा संकल्प व्यक्त केला.

### जनतेला होणारे फायदे आणि नुकसान

**फायदे:**

मराठी एकजूट: ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याने मराठी माणसाच्या भावना आणि अस्मिता पुन्हा एकदा जागृत होऊ शकते. यामुळे मराठी भाषा, संस्कृती, आणि हक्कांचे संरक्षण होण्यास मदत होईल.राजकीय स्थैर्य: मराठी मतांचे एकीकरण झाल्यास शिवसेना आणि मनसे यांना निवडणुकांमध्ये अधिक यश मिळू शकते, ज्यामुळे मराठी माणसाच्या हितांचे रक्षण करणारी सरकारे स्थापन होऊ शकतील.स्थानिक नेतृत्वाला चालना: ठाकरे बंधूंच्या एकजुटीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मराठी नेतृत्वाला प्राधान्य मिळू शकते, विशेषतः 'बीएमसी'सारख्या महत्त्वाच्या संस्थांमध्ये.नुकसान: महाविकास आघाडीतील तणाव: राज ठाकरे यांचा समावेश झाल्यास काँग्रेस आणि राष्ट्रवादीसारख्या पक्षांशी मतभेद वाढू शकतात, ज्यामुळे 'मविआ' कमजोर होऊ शकते.राजकीय अस्थिरता: जर ही युती केवळ भावनिक मुद्द्यांवर आधारित असेल आणि ठोस धोरणात्मक दृष्टिकोन नसेल, तर यामुळे कार्यकर्त्यांमध्ये गोंधळ निर्माण होऊ शकतो.प्रादेशिकतेचा धोका: ठाकरे बंधूंची आक्रमक मराठी अस्मिता केंद्रित धोरणे इतर भाषिक समुदायांमध्ये असंतोष निर्माण करू शकतात, ज्यामुळे सामाजिक सौहार्दावर परिणाम होऊ शकतो.

### नव्या पर्वाची सुरुवात?

उद्धव आणि राज ठाकरे यांचे पुनर्मिलन हा महाराष्ट्राच्या राजकारणातील एक ऐतिहासिक क्षण आहे, जो मराठी अस्मितेच्या रक्षणासोबतच राजकीय समीकरणे बदलण्याची क्षमता ठेवतो. त्यांच्या या एकजुटीमुळे मराठी माणसाला आपली ओळख आणि हक्क पुन्हा मिळवण्याची आशा निर्माण झाली आहे. तथापि, ही एकजूट किती काळ टिकेल आणि त्याचा राजकीय आणि सामाजिक परिणाम किती सकारात्मक असेल, हे त्यांच्या धोरणात्मक दृष्टिकोनावर आणि कार्यान्वयनावर अवलंबून आहे. मराठी माणसाच्या हितासाठी ठाकरे बंधूंनी आपले मतभेद बाजूला ठेवून एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे, आणि त्याचवेळी सामाजिक सौहार्द आणि समावेशकता यांचा समतोल राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे. हा क्षण केवळ मराठी विजयाचा उत्सव नाही, तर महाराष्ट्राच्या राजकारणातील नव्या पर्वाची नांदी ठरू शकतो.



**ॲड. शीतल शामराव चव्हाण**
(मो. ९९२१६५७३४६)

## ताकाला जाऊन भांडे लपवणे

**गेल्या** आठवडाभर होणार, होणार म्हणून संपूर्ण राज्याचे; आणि मराठी माणसाचे लक्ष लागलेला 'विजयोत्सव मेळावा'(?) अखेर पार पडला. दोन ठाकरे बंधूंमधील 'भाऊबंदकी' तब्बल १९ वर्षांनी संपुष्टात आली, याचा प्रत्येक मराठी माणसाला आनंद होणे अपेक्षितच आहे. पण, 'मनोमिलन' झाले का? या प्रश्नाचे उत्तर मात्र मिळाले नाही. खरे तर हा 'राजकीय इव्हेंट' ठरवून घडून आणला होता, हे सांगण्यासाठी कोण्या ज्योतिषाची गरज नाही. पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येलाच सरकारने संयम आणि हुशारीने एक पाऊल मागे घेत, 'हिंदी सक्ती'चे दोन्ही अध्यादेश रद्द करून, ५ तारखेला निघणाऱ्या मोर्चाची हवाच काढून घेतली. ज्या मागणीसाठी आंदोलन छेडले गेले होते, ती मागणी मान्य झाली होती. त्यामुळे 'विजयोत्सव' साजरा करण्याचे काहीच कारण नव्हते. राज ठाकरेंनी तसे जाहीरही केले होते. पण, मुंबई महानगरपालिका आपल्या हातातून निसटली आहे, याची जाणीव झाल्याने; आणि जनतेची सहानुभूती मिळवण्यासाठी ही 'सुवर्णसंधी' आहे, हे हेरून संजय राऊत यांनी 'मराठी माणसासमोर सरकार झुकले आणि सरकारचा पराभव झाला', असे सांगत ५ तारखेला 'विजयोत्सव मेळावा' घेण्याचा केविलवाणा घाट घातला. राज ठाकरे तयार नसतानाही त्यांना तयार केले. मुळात, सरकारने दोन्ही अध्यादेश तात्पुरते रद्द केले आहेत. १ समिती नेमून २ महिन्यांनी अहवाल आल्यानंतर योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे जाहीर केले आहे. याचा अर्थ असा होतो की, सरकारने फक्त १ पाऊल मागे घेतले आहे. अध्यादेश कायमचाच रद्द केला आहे, असा त्याचा अर्थ होत नाही. दुसरे म्हणजे, जर ५ तारखेला मोर्चा निघाला असता; आणि सरकारने दबावात येऊन अध्यादेश रद्द केले असते तर, 'उबाठा' आणि 'मनसे' च्या आंदोलनाचा विजय झाला, असे म्हणता आले असते. मग खऱ्या अर्थाने साजऱ्या केलेल्या जल्लोषाला 'विजयोत्सव' म्हणणे संयुक्तिक ठरले असते. पण, 'अर्ध्या हळकुंडाने पिवळे' होण्याची सवय जडलेल्या नेत्यांनी 'आमच्यापुढे सरकार झुकले आणि आमचा विजय झाला' असा ढोल बडविण्यास सुरुवात केली.केवळ 'मराठीचाच अजेंडा' असेल, अशी जाहिरातबाजी केलेला 'विजयोत्सव मेळावा' मात्र भलतीकडेच भरकटला. दोन ठाकरेंचा व्यासपीठाच्या दोन्ही बाजूंनी विद्युत झोतात झालेला फिल्मी स्टाईल प्रवेश. व्यासपीठावर आल्यानंतर गळ्यात घातलेले हात. शेवटी दोन्ही कुटुंबांचे 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' असे झालेले 'फोटोसेशन'. यामुळे हा 'विजयोत्सव' नसून, संजय राऊत निर्मित आणि दिग्दर्शित 'हम साथ साथ है' या चित्रपटाच्या दुसऱ्या भागाचा ट्रिझर प्रदर्शित झाल्याचे वाटले.राज ठाकरेंनी 'मराठी अजेंड्या'चे भान ठेवत नेहमीप्रमाणेच आक्रमक भाषण केले. पण, नंतर उध्दव ठाकरेंनी अपेक्षेप्रमाणे त्यावर पाणी फेरले. 'मराठी अजेंड्या'चा त्यांना विसर पडून, एखाद्या निवडणुकीच्या प्रचार सभेत भाषण ठोकावे असे ते बोलत होते. भाषणाच्या सुरुवातीलाच फडणविसांचा 'अनाजीपंत' असा उल्लेख केला. मराठीबद्दल बोलण्याऐवजी नेहमीचेच ३ वर्षांपासूनचे गद्दार, पक्ष चोरला, बाप चोरला, टोमणे मारणे हेच मुद्दे त्यांनी भाषणात घेतले. त्या दरम्यान, राज ठाकरेंच्या चेहऱ्यावरील भाव बरंच काही सांगत होते.उध्दव यांनी 'एकत्र आलो कायम एकत्रित राहण्यासाठी' अशी जरी घोषणा केली असली तरी, राज यांनी तसे कोणतेच साधे संकेतही दिले नाहीत. उलट त्यांनी आपल्या नेत्यांना 'युतीबद्दल' कोणीही काही बोलू नका, असे फर्मान सोडले. यावरून उध्दव युतीसाठी किती 'हतबल आणि उताविळ झाले आहेत, हे तर स्पष्ट होते. पण, महानगरपालिका निवडणुका आपण एकटे लढू शकत नाही; आणि लढलोच तर आपला निभाव लागणार नाही, याची त्यांना पुरेपूर जाणीव झाली आहे. केवळ जनतेची सहानुभूती मिळवण्यासाठीच असे नाटके ते करत आहेत. कालच्या 'नौटंकी'तला 'म' हा 'मराठी'चा नसून 'महापालिकेतील मलिदा' लाटण्यासाठीचा आहे, हे जनता चांगलीच ओळखून आहे. पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. आता कितीही नौटंक्या केल्या तरी त्याचा काहीच उपयोग होणार नाही.युतीबद्दल अजून काहीही स्पष्टता नाही. उद्या झालीच तर, जागावाटपात मोठी कसोटी लागणार आहे. कारण, शहरी भागांत दोघांचेही वर्चस्व आहे. उमेदवार निवडून आणण्यासाठी मोठी कसरत करावी लागेल. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे नेतृत्व कोणी करायचे? हा मोठा यक्षप्रश्न उभा ठाकेल. या मुद्यांवर महानगरपालिका निवडणुकीपर्यंत ती टिकेल का? हा महत्त्वाचा आणि आजचा प्रश्न आहे. विधानसभा निवडणुकांना अजून ४ वर्षे बाकी आहेत, हे राऊत बहुधा विसरले असावे. जरी 'हिंदीसक्ती'च्या मुद्द्यावर आक्रमक होऊन मराठी शक्तीचे दर्शन घडवत दोन्ही ठाकरे सहजपणे व्यासपीठावर एकत्र आले असले तरी, महानगरपालिका आणि येणाऱ्या आगामी निवडणुकांत ते एकत्र येतील का? दोघांमध्ये युती होईल का? याचे आज तरी स्पष्ट उत्तर मिळालेले नाही. राज ठाकरेंकडे गमविण्यासारखे काहीच नाही. त्यांचा दूरदृष्टी स्वभाव बघता, ते अगदी सहजपणे तयार होतील, असे आज तरी वाटत नाही. तसेच, त्यांच्या भूमिका वेळोवेळी बदलत असतात, हेही लक्षात घ्यायला हवे, असो.एकंदरीत, युती होईल की नाही? हा उद्याचा प्रश्न आहे. पण, कालचा प्रकार म्हणजे उध्दव ठाकरे यांनी 'ताकाला जायचे, पण भांडे लपवायचे' हे कशाला म्हणतात? हे दाखवून दिले, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

**प्रदीप व्ही. खोलमकर**
नाशिक.
मोबाईल– ८७६७५९२९८०९.

## भक्तीरसात न्हाले मुरूमकर; आषाढी एकादशीनिमित्त भव्य दिंडी

### विठोबा माळ परिसरात उत्स्फूर्त प्रतिसाद

**आरंभ मराठी | मुरुम**

आषाढी एकादशीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्र विठुनामाच्या भक्तीत तल्लिन झालेला असताना रविवारी (ता.६ जुलै) रोजी मुरुम शहरातील हनुमान चौक येथून निघालेल्या पालखी सोहळ्याला आणि महादेवनगर येथील माऊलींच्या प्रतिमेसह सजवलेल्या रथाला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पालखी आणि रथ मिरवणुकीने शहरातील अण्णाभाऊ साठे चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे गोल रिंगण करत वारकरी संप्रदायाची पवित्र परंपरा जपली. टाळ, मृदंग, आणि भक्तीमय अभंगांच्या गजरात वातावरण पूर्णपणे विठ्ठलमय झाले होते. विशेष म्हणजे, विठोबा माळ येथे पहाटेपासूनच दर्शनासाठी लांबच लांब रांग लागली होती. विठोबा व रुक्मिणीच्या दर्शनासाठी शहर व परिसरातील हजारो भाविकांनी गर्दी केली होती. दर्शनाच्या मार्गावर विविध प्रकारच्या फुलांच्या माळा, गूळ, फराळ व प्रसादाच्या दुकानांनी परिसर सजवला होता. दिंडी मार्गावर विविध ठिकाणी, टप्प्याटप्प्यांवर अनेक भक्त बांधवांनी अल्पोपहाराची व पाण्याची व्यवस्था केली होती. त्यामध्ये डॉ.डागा व श्रीकांत मिनियार यांच्या निवासस्थानी



विशेष स्वागत व अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले होते. काही ठिकाणी सामाजिक संस्था आणि तरुण मंडळांनी भाविकांसाठी शीतपेय, लिंबूपाणी, ताक वाटप करून सेवाभाव दाखवला. दिंडी विठोबा माळ येथे पोहोचताच महाआरतीने आणि सामूहिक हरिपाठाने वातावरण आणखी पावन झाले. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने नृत्य, फुगडी, अभंगगायन करत विठ्ठल चरणी आपली भक्ती अर्पण केली. या संपूर्ण सोहळ्यामुळे मुरुम शहरात भक्तिमय, उत्साही आणि सामाजिक एकतेचे अनोखे दृश्य पाहायला मिळाले. पारंपरिक वेशभूषा, टाळमृदंगाचा नाद, वारीतील शिस्त आणि एकत्र येणारे लोक, या सर्वांनी एकादशीचा महिमा अधिकच उजळवला.

## आषाढी एकादशीनिमित्त पळसप येथील विविध शाळांमध्ये रंगला दिंडी सोहळा

**आरंभ मराठी | पळसप**

आषाढी एकादशीनिमित्त विठुरायाचे भक्त दर वर्षी पंढरपूरला जाणाऱ्या पायी दिंडीमध्ये सहभागी होऊन विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला जात असतात. याही वर्षी महाराष्ट्रातील अनेक भागातून गेलेल्या पायी दिंड्या काल (दि.०५) रोजी पंढरपूरमध्ये दाखल झाल्या आहेत. त्याच अनुषंगाने वारकरी संप्रदायाची परंपरा जपत वारकरी दिंडीचा अनुभव आणि आनंद शाळकरी मुलांनाही मिळावा यासाठी गावातील विविध शाळांमध्ये वारकरी दिंडीसोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. पळसप येथील जिल्हा परिषद प्रशाला, ज्ञानविकास प्राथमिक शाळा, जि प प्राथमिक शाळामधील विद्यार्थ्यांनी पारंपरिक



पोशाखात आणि विठ्ठल रुक्मिणी ची वेशभूषा साकारत , हाती भगवे पताका घेऊन दिंडी काढली. टाळ मृदंगाचा गजर करत , विठुरायाच्या नामाचा जयघोष करत गावातील प्रभातफेरी मार्गे हा दिंडी सोहळा गावातील चौका चौकात रिंगण , फुगडी खेळत पुढे जात होता. या दिंडी सोहळ्याचा विद्यार्थ्यांना चांगला आनंद अनुभवायला मिळाला ,तर विद्यार्थ्यांबरोबर गावकरी पालकांनीही यात सहभाग घेत हा दिंडी सोहळा यशस्वी केला. हा दिंडीसोहळा यशस्वी करण्यासाठी जि प प्रशालेचे मुख्याध्यापक पोपट पवार, जि प प्राथमिकचे मुख्याध्यापक सुधीर भुजबळ, ज्ञानविकास प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अतुल काळे तसेच सर्व शाळांचे शिक्षक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## आषाढी एकादशीनिमित्त श्री लिटल चॅम्प स्कूलमध्ये बाल वारकऱ्यांची दिंडी


**आरंभ मराठी | धाराशिव**

आषाढी एकादशीनिमित्त धाराशिव शहरातील तांबरी विभागातील श्री लिटल चॅम्प स्कूलमधील चिमुकल्यांनी भक्तीमय वातावरणात दिंडी काढली. चिमकल्यांच्या या दिंडीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. आषाढीच्या पूर्वसंध्येला चिमुकल्यांनी हरिनामाचा गजर करून परिसर दुमदुमून सोडला.या दिंडीत बालवारकरी हातात भगव्या पताका, टाळ, मृदंग, वीणा घेऊन सहभागी झाले होते. चिमुकल्यांनी दिंडीत पांडुरंग–रुक्मिणी, संतांच्या वेशभुषा, पालखी, टाळ, मृदंग घेऊन पारंपारिक



वेशभूषेत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. बाल वारकऱ्यांच्या या दिंडीचे नागरिकांनी कौतुक केले.दिंडीसाठी शाळेतील शिक्षक, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालय: सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,



सातारा जिल्ह्यातील निवडे (डफळवाडी) येथील गर्द झाडीतून कोसळणारा धबधबा सध्या पर्यटकांसाठी पर्वणी ठरत आहे. हा धबधबा पाहण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत असून, हे चित्र डोळ्याचे पारण ेफेडत आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त नळदुर्गमध्ये मिरवणूक

**आरंभ मराठी | नळदुर्ग**

आषाढी एकादशी निमित्त ६ जुलै रोजी नळदुर्ग येथील मराठा गल्ली येथील भजनी मंडळाच्या वतीने नळदुर्ग शहरातुन भव्य पालखी मिरवणुक काढण्यात आली. या पालखी मिरवणुकीमुळे शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते.६ जुलै रोजी संपुर्ण राज्यात आषाढी एकादशीचा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. नळदुर्ग शहरातही आषाढी एकादशीचा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. शहरातील मराठा गल्ली येथील भजनी मंडळाच्या वतीने शहरातुन भव्य पालखी मिरवणुक काढण्यात आली. सकाळी ८ वा. मराठा गल्ली येथील विठ्ठल – रुक्मिणी मंदिरातुन माऊलीची पालखीतुन टाळ – मृदंगाच्या गजरात भव्य मिरवणुक काढण्यात आली. ही मिरवणुक मराठा गल्ली येथुन निघाल्यानंतर काजी गल्ली, भोई गल्ली, क्रांती चौक, चावडी चौक, महात्मा बसवेश्वर महाराज









चौक, भवानी चौक,राम मंदिर, सावरकर चौक, धर्मवीर संभाजी महाराज चौक मार्गे दुपारी १२ वा. मराठा गल्ली येथील विठ्ठल – रुक्मिणी मंदिरात आल्यानंतर मिरवणुकीचे विसर्जन करण्यात आले. मिरवणुक निघाल्यानंतर मिरवणुक मार्गावरील प्रत्येक चौकात मिरवणुकीचे स्वागत करून माऊलीचे दर्शन घेण्यासाठी नागरीकांनी विशेष करून महिलांनी मोठी गर्दी केली होती. अनेक ठिकाणी रांगोळी काढुन व पालखीवर फुले उधळुन मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले. टाळ – मृदंगाचा गजर व बहारदार भजन तसेच मिरवणुकीतील सहभागी झालेल्या महिला, पुरुष, युवक लहान मुलींनी टाळ – मृदंगाच्या तालावर फुगडी खेळुण आनंदोत्सव साजरा केला. यावेळी बंदोबस्तासाठी असलेल्या महिला पोलिस कर्मचारी व होमगार्ड महिला कर्मचाऱ्यांनीही फुगडी खेळण्याचा आनंद लुटला.पालखी मिरवणुक सावरकर चौकात आल्यानंतर माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांच्या निवासस्थानी त्यांनी पालखीचे भव्य स्वागत करून मिरवणुकीतील नागरीकांना केळी व शाबु चिवड्याचे वाटप केले. या मिरवणुकीत भजनी मंडळाचे मोहीत कलकोटे, खाटमोडे, तानाजी जाधव गुरुजी, मिलिंद भुमकर, बलभीमराव मुळे, सुभद्राताई मुळे,विमलबाई काळे,महेश जाधव, संजय बेले, मोहन डोंगरे, सुहास येडगे, तानाजी जाधव, तानाजी मुळे,कुरुक्षेत्र किल्लेदार, विलास येडगे, सुधीर हजारे, संतोष पुदाले, सरदारसिंग ठाकुर,अन्ना जाधव, तुकाराम जाधव,धनाजी जाधव, दीपक काशिद, डॉ. दीपक जगदाळे,अमर भाळे, सुधीर हजारे, अमोल सुरवसे, बालाजी ठाकुर, शिवाजी सुरवसे, तानाजी सुरवसे, प्रशांत पवार यांच्यासह शिवशाही तरुण मंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व भजनी मंडळाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.मिरवणुक सोहळ्यानंतर सर्व भाविकांना मराठा गल्ली येथे महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# बाल वारकऱ्यांची दिंडी, विठ्ठल नामाचा जयघोष

**आरंभ मराठी | धाराशिव**

आषाढी एकादशीनिमित्त पालखीसोबत शाळकरी वारकऱ्यांनी दिंडी काढत विठ्ठल नामाचा जयघोष केला. शिंगोली आश्रम शाळेच्या वतीने निघालेली जनजागृती दिंडी लक्षवेधी ठरली.सकाळी ८:४५ वाजता पालखीचे पूजन,मुख्याध्यापक अण्णासाहेब चव्हाण, मुख्याध्यापक सतीश कुंभार आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. वारकऱ्यांच्या वेशभूषेतील विद्यार्थी–विद्यार्थिनी दिंडीत सहभागी झाले होते. ढोल,झांज पथक,विठ्ठल भक्तीची गीते,टाळ मृदंग आणि विठ्ठल नामाच्या गजराने शिंगोली आश्रम शाळेतील दिंडी सोहळा लगतच्या तांडा,वस्त्यावर लक्षवेधी ठरला.झाडे लावा झाडे जगवा, शिक्षणाचा दिवा घरोघरी लावा, अडाणी आई, घर वाया जाईल, असा संदेश आषाढी पालखी सोहळ्यामध्ये सहभागी झालेल्या वारकऱ्यांनी यावेळी दिला.गळ्यात टाळ,डोक्यावर तुळशी वृंदावन,घेतलेले शाळकरी विद्यार्थी,विठ्ठल रुक्मिणी तसेच विविध संतांची वेशभूषा लक्षवेधक ठरली.आषाढी एकादशी





आणि त्याचे महत्त्व या संदर्भात मुख्याध्यापक चव्हाण यांच्यासह शाळेतील विद्यार्थिनी राधा रोहिदास आणि अंजली चव्हाण यांनी दिली. यावेळी खंडू पडवळ,रत्नाकर पाटील,प्रशांत राठोड,दिपक,खबोले,शानिमे कैलास, मल्लिनाथ कोणदे,विशाल राठोड,सचीन राठोड,वरिष्ठ लिपीक संजीवकुमार मस्के,सुरेखा कांबळे,श्रद्धा सुर्यवंशी,ज्योती राठोड,ज्योती साने,बालिका बोयणे, वैशाली शितोळे इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सागर सुर्यवंशी,अविनाश घोडके, सचीन अनंतकळवास,रेवा चव्हाण व विद्यार्थी आषाढी एकादशीच्या पालखी वारकरी दिंडी सोहळ्यात मोठया संख्येने सहभागी झाले होते.

# नळदुर्गमध्ये मोहरम सण साजरा



**आरंभ मराठी | नळदुर्ग**

नळदुर्ग येथे रविवारी मोहरम सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. इस्लामी कॅलेंडरनुसार १ ते ५ मोहरम दरम्यान बडे बारे इमाम, छोटे बारे इमाम, इमाम कासीम, अब्बास अली, हुंडे नालसाब, नाले हैदर, आली असगर, मौला अली, हुसेन बादशाह या पंज्यां (सवाऱ्यांसह) एकूण १० ठिकाणी प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर मोहरमच्या ६ ते ९ तारखे दरम्यान प्रथेनुसार दररोज काही पंजे (सवाऱ्या) प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या ठिकाणाहून उचलून पुन्हा त्याच जागेवर बसविण्यात आले. नळदुर्ग येथे मोहरम निमित्त कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये रविवारी अर्थात मोहरमच्या १० दिवशी सर्वप्रथम दुपारी २ वाजता ऐतिहासिक किल्ल्यातील सरकारी पंजे (सवाऱ्या) असलेल्या बडे बारे इमाम व छोटे बारे इमाम यांना जागेवरून उठून बाहेर आणण्यात आले. त्यानंतर इमाम खासिम, अब्बास अली, नाले हैदर,हुंडे नाल साब, अली असगर, हुसेन बादशाह हे पंजे प्रतिष्ठान करण्यात आलेल्या जागेवरून उठविल्यानंतर बडे बारे इमाम व छोटे बारे इमाम यांच्या १४ चकरा पूर्ण झाल्यानंतर सर्व सवाऱ्या किल्ला गेट येथील हजरत सय्यद सादिक शाह वली चौक येथे एकत्रित येऊन एकमेकाची गळा भेट घेतल्यानंतर मोहरमच्या मुख्य मिरवणुकीला सुरुवात झाली. ही मिरवणूक पोलीस ठाण्यासमोर मिसरी गंज चौक, क्रांती चौक, चावडी चौक, हजरत सय्यद बुरहानोद्दीन शाह वली रहे. दर्गाह, शास्त्री चौक, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, बस स्टँड, हजरत हबीबुल्ला हुसेनी चौक, मार्गाने निघून नानीमॉ दर्गाहच्या पाठीमागे असलेल्या कर्बला मैदानमध्ये पंजे (सवाऱ्या) चे विसर्जन करण्यात आले.यावेळी नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन यादव सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकिशोर सोळुंके, आनंद कांगूने पोलीस उपनिरीक्षक संतोष गीते, जिविशाचे अमर जाधव,बालाजी शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल खलील शेख, हसन शेख यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.१० दिवस चालणाऱ्या मोहरम सणानिमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमासाठी मैनोद्दीन शेख, नुरोद्दीन शेख, मैनोद्दीन सय्यद, खमरोद्दीन शेख, नदीम शेख, अफसर शेख, शहाबोद्दीन शेख, जैनोद्दीन शेख, रहेमान कुरेशी, कौसर शेख, सलाउद्दीन शेख, अजहर शेख, इसाक गाताडे, निजाम शेख, अबुबकर शेख,इलाही बागवान,शाहेद कुरेशी, तौफिक कुरेशी,गौस कुरेशी, वसीम कुरेशी, सलीम सय्यद,जब्बार कुरेशी, राजू शहा,अजीत सय्यद ,सज्जाद सावकार, शमशोद्दीन शेख,सय्यद शेख, सलीम शेख, अन्वर शेख, इस्माईल शहा,सुलतान शेख, महेबूब सय्यद, इकबाल शाह, फारुक शहा, युसुफ शेख, निखिल शहा,महेबूब गाताडे,खालेद इनामदार,दानिश शेख यांनी परिश्रम घेतले. यौमे अशुराच्या निमित्ताने यादे हुसेन म्हणून शहरातील विविध भागांमध्ये शरबत वाटप करण्यात आले तसेच शहरातील मस्जिदीमध्ये नमाज पठण करण्यात आली.तसेच हजरत इमामे हसन रहेमतुल्लाह अलैह व हजरत इमामे हुसेन रहेमतुल्लाह अलैह यांच्यासह शोहदा ए करबलासाठी विशेष प्रार्थना करण्यात आली.

# यशवंतराव चव्हाण विद्यालयातील बाल वारकऱ्यांची दिंडी



**आरंभ मराठी | धाराशिव**

येथील रेल्वे स्टेशन रोडवर असलेल्या यशवंतराव चव्हाण विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त वारकऱ्यांच्या वेशभूषेत दिंडी काढली.यानिमित्त विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्व आणि वारकरी संप्रदायाची माहिती देण्यात आली.बाल वारकऱ्यांच्या दिंडीमध्ये सहभागी झालेल्या काही विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणी तर काही विद्यार्थ्यांनी संतांची वेशभूषा केली होती. या कार्यक्रमासाठी संस्थेचे मार्गदर्शक डॉ.गणपत मोरे, कात्रे सर, यादव सर, गंभीरे सर मुख्याध्यापिका



श्रीमती दुरुगकर मॅडम उपस्थित होते. डॉ.गणपतराव मोरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. टाळाच्या व विठ्ठलाच्या नामघोषात कार्यक्रम साजरा झाला. चिमुकल्यांना खाऊ देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# मुरुम शहरात बालदिंडीने भक्तिरसाचा रंग; कला सादरीकरणाचे शहरवासियांकडून कौतुक

## विद्यार्थ्यांनी विविध संत वेशभूषेतून साकारला भक्तिभाव, नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**आरंभ मराठी | मुरूम**

मुरुम येथील गुरुकुल प्री–प्रायमरी स्कूल, शांतिनिकेतन विद्यामंदिर आणि नूतन प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी एकत्र येत पारंपरिक भक्तिपथदिंडीचे सुंदर दर्शन घडवले. विविध संत व साधूंच्या वेशभूषेत साकारलेल्या या बालदिंडीत लहानग्यांनी भक्तिभाव, निरागसता आणि सांस्कृतिक जाणीवेचा संगम घडवला. गुरुकुल प्री–प्रायमरी स्कूलच्या बालदिंडीची सुरुवात शाळेपासून झाली. ही दिंडी छत्रपती संभाजीनगर मार्गे अक्कलकोट रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत नेण्यात आली आणि तेथून पुन्हा शाळेत परत आणण्यात आली. विद्यार्थ्यांनी जय हरी विठ्ठल, जय हरी विठ्ठल'' असा नाम घोष करत मार्गक्रमण केले. त्यांच्या टाळांच्या निनादाने परिसर भक्तिरसात न्हाल्यासारखा वाटत होता. शांतिनिकेतन विद्यामंदिरच्या बालदिंडीने शाळेपासून छत्रपती शिवाजी महाराज चौक, महात्मा बसवेश्वर चौक,





अण्णाभाऊ साठे चौक, ते हनुमान चौक असा विस्तारित मार्ग घेतला. दिंडी दरम्यान विद्यार्थ्यांनी नृत्य, फुगडी, टाळ–मृदंग यांच्या साथीने वातावरण उत्साहमय ठेवले. प्रतिभा निकेतन इंग्लिश मिडीयम व नूतन प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी मुरुम शहरातील पारंपरिक मिरवणूक मार्गावरून ग्राम प्रदक्षिणा करत भक्तिपरंपरेचा वारसा जपला. बालदिंडी पाहण्यासाठी शहरवासीयांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती. लहानग्यांचे वेश, चेहरे, हावभाव, आणि टाळ–चिपळ्यांच्या तालावर केलेले पदन्यास पाहून अनेक नागरिक भारावून गेले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक–शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, तसेच विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील विविध भागांतून काढण्यात आलेल्या या बालदिंडीमुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय, प्रसन्न आणि उत्सवाचे वातावरण निर्माण झाले.

# विद्यार्थ्यांनो, उद्योजक बना!

## सहकार दिनानिमित्त कार्यक्रमात दत्ताभाऊ कुलकर्णी यांचे आवाहन

**आरंभ मराठी | धाराशिव**

सहकारात मोठी ताकद आहे. सहकारातून महाराष्ट्र राज्य समृद्ध बनले. सहकार ही काळाची गरज असून, उद्योग, व्यापाराला गती देण्यासाठी सहकार चळवळ सक्षम झाली पाहिजे. विद्यार्थांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता उद्योजक बनावे, त्यासाठी सहकार समजून घ्यावा, असे आवाहन श्री.सिद्धिविनायक परिवाराचे प्रमुख दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी केले. शहरातील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात श्री.सिद्धिविनायक परिवाराच्या वतीने सहकार सप्ताह दिन साजरा करण्यात आला. या आयोजित विशेष कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.संदीप देशमुख तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री.सिद्धीविनायक परिवाराचे संस्थापक आणि भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी होते. यावेळी कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांशी सहकार विषयावर प्रेरणादायी संवाद साधला. सहकार म्हणजे केवळ संस्था चालविणे नव्हे, तर ती लोकसहभागातून उभी राहिलेली लोककल्याणकारी चळवळ आहे. युवकांनी नोकरीच्या मागे धावण्याऐवजी सहकार क्षेत्रातील संधी





ओळखून उद्योजक व्हावे.सहकाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी, महाराष्ट्रातील सहकार चळवळीचा विकास, ग्रामीण भागातील सहकारी संस्थांची भूमिका तसेच श्री.सिद्धीविनायक परिवाराच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात केलेल्या कार्याचा अनुभव कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांपुढे उलगडून दाखवला. या कार्यक्रमात वाणिज्य शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींची उपस्थिती लक्षणीय होती. सहकार क्षेत्राचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी श्रीसिद्धीविनायक बँकेच्या जनरल बॉडी मीटिंगला उपस्थित राहावे, असे आवाहन कुलकर्णी यांनी केले. यावेळी कार्यक्रमास उपप्राचार्य बबन सूर्यवंशी, प्रा.डॉ. अभय देशमाने वाणिज्य शाखेतील विद्यार्थी–विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.वैभव आगळे यांनी केले तर कार्यकारी संचालक गजानन पाटील यांनी आभार मानले.

# पाथर्डी शाळेचे विद्यार्थी रमले विठ्ठलाच्या नामस्मरणात



**आरंभ मराठी | कळंब**

कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी येथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये वारकरी संप्रदायाच्या महान परंपरेची जाणीव जागृती होऊन संस्कारक्षम पिढी घडावी या उद्देशाने बाळ गोपाळांच्या वारकऱ्यांची दिंडी गावात मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यामध्ये विठ्ठल – रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत मुक्ताबाई, संत नामदेव, संत जनाबाई, टाळकरी, विणेकरी, वारकरी अशा विविध वेशभूषा करून आलेल्या भव्य दिव्य दिंडीचे गावभरात माता माऊलींनी औक्षण करून पालखीचे स्वागत व पूजन केले. याप्रसंगी सरपंच, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा, माजी सरपंच, ग्रामस्थ यांनी विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ पालखीचे पुजन, श्रीफळ फोडून, पुष्पहार अर्पण करून भव्य स्वागत केले. या दिंडीमध्ये गावातील सर्व भजनी मंडळ यांनी विविध अभंग गायन करून विठ्ठलाच्या भक्तीचा महिमा गायला. या दिंडीमध्ये गावातील भजनी मंडळ, तरुण मंडळ, ग्रामस्थ, पालक ,महिला यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचा शेवट सर्व विद्यार्थी, ग्रामस्थ, वारकऱ्यांना केळी व चहा वाटप करून करण्यात आला. या दिंडीसाठी शाळेच्या वतीने मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, सहशिक्षक धनंजय गव्हाणे, सरोजिनी पोते, मनीषा पवार, सुरेखा भावले यांनी परिश्रम घेतले. आरती करून दिंडीची सांगता करण्यात आली.

# उद्घाटन होऊन दोन महिने उलटले, तुळजापूर बस स्थानकात सुविधांचा अभाव

## ना पिण्याचे पाणी,ना सीसीटीव्ही कॅमेरे; प्रवाशांच्या समस्या कायम

सुरज बागल | आरंभ मराठी

**तुळजापूर – तीर्थक्षेत्र तुळजापूर येथे तब्बल आठ कोटी रुपयांचा निधी खर्चून बांधण्यात आलेल्या जुन्या बस स्थानकाचे उद्घाटन होऊन दोन महिने उलटले तरीसुद्धा पिण्याचे पाणी देखील प्रवाशांना उपलब्ध होत नाही. यामुळे राज्यभरातून येणाऱ्या भाविकांसह नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत आहेत. त्यांना पैसे खर्चून विकतचे पाणी पिऊन तहान भागवावी लागत आहे. तसेच सुरक्षेच्या दृष्टिकोनातून या बस स्थानकात सुरक्षा व्यवस्था रामभरोसे असल्याचे दिसून येत असून सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने येथे शाळकरी मुली व महिलांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. तसेच बस स्थानक परिसरात चोरट्यांचे प्रमाण वाढले आहे. सध्या या बस स्थानकात प्रवाशांना असंख्य अडचणींचा सामना करावा लागत आहे.**

तीर्थक्षेत्र तुळजापूर येथे येणाऱ्या भाविकांच्या सुविधांसाठी दोन बस स्थानक निर्माण करण्यात आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौका जवळील बस स्थानकाची जुनी इमारत पाडून नूतनीकरण करण्यात आले आहे. या बस स्थानकाच्या बांधकामावर सुरुवातीपासूनच प्रश्नचिन्हे निर्माण केले गेले आहेत. याबाबत विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटना यांनी निवेदने देऊन या बस स्थानकाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे तक्रारी दिल्या होत्या. तरीही दिनांक ३० एप्रिल रोजी या बस स्थानकाचे परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. मात्र अजूनही येथे पिण्याच्या पाण्याची व सीसीटीव्ही कॅमेऱ्याची सोय झाली नसून त्यामुळे या सुविधा तात्काळ पुरवण्याची मागणी प्रवाशातून होत आहे. या बस स्थानकाच्या तक्रारीच्या अनुषंगाने परिवहन मंत्री तथा पालकमंत्री यांनी चौकशीचे आदेश देखील दिलेले आहेत. पालकमंत्री सरनाईक यांची चौकशीचे आदेश देऊन ४० दिवस झाले तरीदेखील अजूनही चौकशीचा अहवाल प्राप्त झालेला नाही.



### निकृष्ट काम केलेल्या व्यक्तींवर गुन्हे दाखल करावेत

बस स्थानकाच्या कामाबाबत सुरुवातीपासूनच आम्ही जिल्हाधिकारी तसेच विभाग नियंत्रक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रारी दिल्या होत्या. या बस स्थानकाच्या निकृष्ट दर्जाच्या कामाच्या बाबतीत जे दोषी असतील त्यांच्यावर तात्काळ गुन्हे नोंद करावे तसेच अपहार केलेली रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात यावी .

**श्रीकृष्ण सूर्यवंशी**
तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

### सुविधा लवकरच उपलब्ध करून दिल्या जातील

आगामी काही दिवसात येथे सीसीटीव्ही कार्यान्वित करण्यात येणार असून पिण्याच्या पाण्यासाठी आरो प्लांट देखील आणण्यात आला आहे. मात्र तो अद्याप फिटिंग करण्यात आलेला नाही. तोही लवकरच फिटिंग करून भाविकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच सुलभ शौचालासाठी दहा रुपये आकारण्यात येत असतील तर याबाबत सक्त सूचना देण्यात येतील.

**रामचंद्र शिंदे**
आगार प्रमुख, तुळजापूर.



### सुलभ शौचालयासाठी दहा रुपयांची लूट

या बस स्थानकात सुलभ शौचालयासाठी भाविकांकडून तसेच प्रवाशांकडून दहा रुपये आकारण्यात येत आहेत. यामध्ये प्रवाशांकडून पाच रुपये घेण्याच्या सूचना आहेत, मात्र येथील परवानाधारक भाविकांकडून दहा रुपये घेत आहेत. याकडे लक्ष देऊन बेकायदेशीर वसुली थांबवावी अशी मागणी प्रवासी करत आहेत.

### बस स्थानकाच्या पाठीमागील जागेत वाढले गवत

हे बस स्थानक बांधताना पाठीमागे विनाकारण मोठ्या प्रमाणावर मोकळी जागा सोडण्यात आली आहे. मात्र आता या जागेत मोठ्या प्रमाणावर कचरा पडत असून गाजरगवत देखील वाढले आहे. यामुळे डासांचा प्रादुर्भाव होत आहे. त्यामुळे याठिकाणी स्वच्छता करण्याची गरज आहे.

### ठेकेदाराने स्वतःचे घर भरले

या बस स्थानकाचे काम हे नकाशा तसेच अंदाजपत्रकाप्रमाणे झाले नाही. या कामातून ठेकेदार व लोकप्रतिनिधीने स्वतःची घरे भरून घेतली आहेत. प्रवाशांना मात्र उघड्यावर पाडले आहे.

**श्याम पवार**
माजी उपजिल्हाप्रमुख, शिवसेना (उबाठा)

## कौडगाव जिल्हा परिषद शाळेत आषाढी वारीनिमित्त दिंडी



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव तालुक्यातील कौडगाव येथील जिल्हा परिषद शाळेत शनिवारी (दि.५) आषाढी वारी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थी, पालक व शिक्षक सहभागी झाले होते. यावेळी गावातून दिंडी काढून फुगडी, अभंग गायन, भजन इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले. दिंडीचे आयोजन श्रीमती आटपळकर सुमित्रा, श्रीमती माळी ज्योत्स्ना, मोटे जयमाला, सुरवसे संगीता, 'माणिक शेट्टी राजकुमार, घोगरे अदित्य, विजय थोरात ,घोंगडे रवींद्र, धोंगडे राजेश उपस्थित होते.

## उमरगा तालुक्यातील तलमोड प्रशालेत पालक मेळावा उत्साहात



आरंभ मराठी | उमरगा

भारत शिक्षण संस्था, उमरगा संचलित तलमोड येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय या शाळेत शनिवारी इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांच्या गुणात्मक वाढीसाठी पालक – मेळावा आयोजित करण्यात आला होता. मागील वर्षाचा निकाल आणि विद्यार्थ्यांच्या अडचणी,पालकांच्या समस्या, तसेच शिक्षक – विद्यार्थी आणि पालक यांच्यामध्ये समन्वय असावा या दृष्टीने आणि वर्षभरामध्ये घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षा तसेच उपक्रम याविषयी याप्रसंगी चर्चा करण्यात आली. यावेळी जगदाळवाडी, देवीनगर, तलमोड तांडा, थोरलीवाडी, धाकटीवाडी, तलमोड गावातील पालक वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते. पालक मेळाव्याचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापकजे. ए. मोरे हे होते तर सूत्रसंचलन एम. आर. सूर्यवंशी यांनी केले.

## छत्रपती शंभूराजे स्कूलमध्ये चिमुकल्यांची दिंडी



आरंभ मराठी | धाराशिव

शहरातील बालाजी नगर भागातील छत्रपती शभुराजे प्री प्रायमरी इग्लीश स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त बालवारकऱ्यांनी दिंडी काढून आषाढी एकादशीचा आनंद द्विगुणित केला. छ. शभुराजे प्री प्रायमरी इग्लीश स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. जणू विठ्ठल नामाचीच शाळा भरली होती. बालचिमुकल्याची विठ्ठल रुक्मिणी, वारकरी साकार केले होते. नामघोष करीत बालगोपाळाची दिडी काढण्यात आली. यासाठी प्राचार्य विद्या गायकवाड,अश्विनी देवकते अध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यासह सदस्य व पचक्रोशीतील पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## येरमाळा येथे विद्यार्थ्यांच्या दिंडीमुळे भक्तिभावाचे वातावरण



आरंभ मराठी | येरमाळा

येरमाळा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी या पवित्र सणाचे औचित्य साधून मोठया शनिवारी (दि.५) भक्तिभावाने दिंडी काढली. पारंपारिक वेशभूषा परिधान करून, डोक्यावर तुळशीचे रोपटे घेऊन, हातात टाळ–मृदंग घेत विठ्ठलनामाचा गजर करीत गावातील मुख्य रस्त्यांवरून पायी दिंडी काढण्यात आली. दिंडीच्या समोर सजावट केलेली पालखी व विठ्ठल रुक्मीणीचा पोशाख परिधान केलेले विद्यार्थी होते. या दिंडीमध्ये गावातील कांही विठ्ठल भक्तांनीही सहभाग घेतला होता. 'माऊली– माऊली ', 'ज्ञानोबा तुकाराम ' 'तुकाराम महाराज की जय ', 'ज्ञानोबा माऊली', 'पुंडलिक वरदा हरि विठ्ठल' विद्यार्थ्यांच्या अशा घोषणांनी परिसर दुमदुमुन गेला. दिंडीच्या अगोदर विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदाय, संत परंपरा, आणि विठ्ठलभक्ती याविषयी माहिती देण्यात आली. सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनींची वेशभूषा करण्यासाठी शाळेतील शिक्षीका सुनंदा जाधव, मनिषा वाघमारे, भारती देशमुख, वणवे मॅडम, उकिरडे मॅडम, कांचन चेचे मॅडम, सत्यशिला काळे यांनी परिश्रम घेतले. तर दिंडी शिस्तबद्ध व्हावी यासाठी केंद्रप्रमुख अनिल बारकुल, मुख्याध्यापक पडवळ सर, मुख्याध्यापक ठोंबरे सर, शिक्षक दिनेश शेरखाने यांनी परिश्रम घेतले. यावेळी पूर्ण येरमाळा गावामध्ये भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

## हायटेक इंग्लिश स्कूलमध्ये विठ्ठल नामाची शाळा भरली

आरंभ मराठी | येणेगूर

उमरगा तालुक्यातील येणेगूर येथील हायटेक इंग्लिश स्कूल येथे शनिवारी (दि.५) विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त दिंडी काढली विठ्ठल–नामाचा जप केला आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सरस्वती मोरे यांच्या हस्ते विठ्ठल रूक्मिणी प्रतिमचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा करून दिंडी काढली. दिंडीमध्ये विठ्ठल–नामाचा जयघोष करण्यात आला. आषाढी एकादशीनिमित्त सांस्कृतिक विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये भजन, कीर्तन, आणि पारंपरिक वेशभूषेतील मुलांचे कार्यक्रम सादर केले व पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यासाठी दिंडी काढली. काही विद्यार्थ्यांनी वृक्ष दिंडी काढली आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला.या सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनी विठ्ठल–रूक्मिणी, संत यांच्या वेशभूषेसह विणेकरी, वारकऱ्यांच्या वेशात दिंडीत सहभाग नोंदवला.

## खेडमध्ये कृषी दुतांच्या माध्यमातून माहिती फलकाचे उद्घाटन



आरंभ मराठी | धाराशिव

गावातील शेतकरी व प्रसारमाध्यमे यांच्यातील दरी कमी व्हावी व शेतकऱ्याला त्याच्या उपयोगाची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी,या उद्देशाने आळणी (ता.धाराशिव) कृषी महाविद्यालयातील कृषिदुताच्या माध्यमातून खेड ग्रामपंचायतसमोर कृषिदुतांनी माहिती फलकाचे आयोजन केले. गावातील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.सरपंच सुनील गवाड, ग्रामसेवक हरिकेश घुटे, पोलिस पाटील बिभीषण गवाड यांच्यासह ग्रामस्थांनी यात.सहभाग नोंदवला. याप्रसंगी या शैक्षणिक उपक्रमाचे समन्वयक व्यवस्थापक हरि घाडगे, प्रमुख प्रा. देवानंद शेटे, प्राचार्य डॉ. क्रंतिकुमार पाटील, प्रा.डॉ रोहित इंगळे प्रा. अमित गांधले, प्रा.प्रताप खोसे आदी उपस्थित होते. कृषिदूत प्रणय कोळेकर, गोरे सिद्धांत, माळी ज्ञानेश्वर, मदने सौरभ, काटमोरे सार्थक, अभिषेक अनभुले, अभिजित घुगे, देवानंद चौधरी यांनी गावकरी व शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला व सर्व ग्रामस्थांना माहिती फलकाचे महत्त्व पटवून सांगितले.

## ज्ञानोबा-माऊली-तुकाराम च्या जयघोषात प्रदक्षिणा



आरंभ मराठी | मुरुड

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आषाढी एकादशी निमित्त मुरुड शहरातून नगर प्रदक्षिणा उत्साहात पार पडली. या नगर प्रदक्षिणेमध्ये मुरुड शहरातील सर्वच भजनी मंडळी व वारकऱ्यांनी सहभाग घेतला होता. ज्ञानोबा– माऊली– तुकाराम–च्या जयघोषाने अवघी मुरुड नगरी दुमदुमून गेली होती. सकाळी ठीक दहा वाजता विठ्ठल मंदिरातून या नगर प्रदक्षिणेला सुरुवात झाली. मुख्य वेशीतून ही नगर प्रदक्षिणा अहिल्याबाई होळकर चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, बस स्टॅन्ड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अण्णाभाऊ साठे चौक तसेच पुढे विठ्ठल मंदिर या ठिकाणी आली. मुरुड शहरामध्ये जागोजागी या नगर प्रदक्षिणेमध्ये सहभागी झालेल्या वारकऱ्यांसाठी व भजनी मंडळींसाठी फराळ चहापाण्याची सोय करण्यात आली होती. यामध्ये शिवाजीनगर येथील पवनपुत्र हनुमान मंदिरासमोर भारतीय जनता पार्टीच्या वतीने फराळाची सोय करण्यात आली होती, तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी शहरातील सवासे परिवाराच्या वतीने ही फराळाची सोय केली होती. जागोजागी चहा पाण्याची ही सोय नागरिकांच्या वतीने करण्यात आली होती.

यावेळी ज्ञानोबा माऊली तुकाराम या जयघोषाने संपूर्ण मुरुड शहर दुमदुमून गेले, सुंदर अभंग, गवळणी, टाळ,मृदंग,विनाच्या गजरामध्ये सर्व मुरुडकर मंत्रमुग्ध झाल्याचे पहायला मिळाले.

## ज्ञानाने संपन्न पिढीच राष्ट्राची खरी ताकदः प्रा.डॉ.यशवंत पाटणे

आरंभ मराठी | उमरगा

''ज्ञानाने संपन्न पिढी हीच राष्ट्राची खरी ताकद असते. ध्येयवादी शिक्षक आणि गुणवंत विद्यार्थी समाजाच्या प्रगतीसाठी दीपस्तंभ ठरतात. ज्ञानज्योती पुरस्कार हा ज्ञानसंस्कृतीचा गौरव आहे,'' असे प्रतिपादन जेष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. यशवंत पाटणे यांनी केले. उमरगा शहरातील ओम बालाजी मंगल कार्यालयात माजी आमदार तथा शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले यांच्या ज्ञानज्योती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने रविवारी(ता.६ जुलै) रोजी ज्ञानज्योती गुणवंत विद्यार्थी सत्कार व पुरस्कार वितरण सोहळा २०२५ पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून पाटणे सर बोलत होते.प्रा. पाटणे पुढे म्हणाले, ''शिक्षण हे सर्वांगीण प्रगतीचे प्रवेशद्वार आहे. बहुजन समाज शिक्षणापासून वंचित राहिला, तर पुढील पिढ्या आर्थिक व सामाजिक दृष्ट्या दुर्बल ठरतील, हे ओळखून महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील वंचित घटकांना शिक्षणाचा मार्ग दाखवला. ज्ञानराज चौगुले यांनी हा वारसा पुढे नेला आहे.'' आजच्या चंगळवादी काळात तरुणाई दिशाहीन होत चालली असून, शिक्षकांनी



विद्यार्थ्यांमध्ये सद्गुणांची बीजे पेरावी, असे आवाहन त्यांनी केले. ''गुणवत्ता म्हणजे फक्त परीक्षेतील गुण नाही, तर कठीण परिस्थितीत मिळवलेले यश म्हणजे खरी गुणवत्ता,'' असेही ते म्हणाले.यावेळी उमरगा व लोहारा तालुक्यातील इयत्ता दहावीतील प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवलेल्या तसेच बारावीतील शाखानिहाय प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच चि. प्रतिक कांबळे, चि. विशाल शेटगार, चि. कृष्णा लडडा, कु. अंबिका जमादार, कु. ऋतीका भोसले यांना उच्च शिक्षणासाठी संस्थेने शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतला असून, पहिला धनादेश मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. रविंद्र गायकवाड होते. उद्घाटक माजी आमदार ज्ञानराज चौगुले, भाजपचे अभय चालुक्य, युवासेना विभागीय निरीक्षक किरण गायकवाड, ज्ञानज्योती संस्थेच्या अध्यक्षा ॲड. आकांक्षा चौगुले, जिल्हाप्रमुख मोहन पणुरे, नगराध्यक्षा वैशालीताई खराडे, गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, शिवकुमार बिराजदार, उषाताई गायकवाड, ज्योतीताई चौगुले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. आकांक्षा चौगुले यांनी केले. सूत्रसंचालन संदीप जगताप व आरोही जमादार यांनी, तर आभार उपाध्यक्ष विजय वडदरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बळीराम सुरवसे, जगन्नाथ पाटील, विजयकुमार वडदरे, प्रदीप मदने, अमर देशटवार, कुमार निकम, राजा देशेट्टी, शुभांगी जगताप, बी.के. पवार, पंढरीनाथ कोणे, चंद्रशेखर सूर्यवंशी, नाना मदनसुरे, गोपाळ जाधव, अशोक पतगे, शेखर घंटे, शरद इंगळे, हनमंत गुरव, संदीप चौगुले, मनोज जाधव यांचे विशेष योगदान लाभले.



**कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिलेल्या मान्यवरांना ज्ञानज्योती पुरस्कार देण्यात आले.प्रा.शिवमूर्ती भांडेकर (शिक्षण व साहित्य),प्रा. कांतराव सोमवंशी (प्रसिद्ध बासरीवादक),योगीराज माने (ज्येष्ठ कवी व साहित्यिक), रणजीतसिंह ठाकूर (राष्ट्रीय व्हॉलीबॉलपटू), देवीसिंग भीमसिंग राजपूत (ज्येष्ठ पत्रकार),गोविंद पवार (प्रगतशील शेतकरी),माधव मारूती जाधव (आदर्श सरपंच),सौ. वर्षा किशोर माने (महिला गृह उद्योजिका) यांचा यामध्ये समावेश अहे.**

## भाई बळवंतराव घोगरे जयंती उत्साहात साजरी



आरंभ मराठी | धाराशिव

तालुक्यातील उपळा येथे हरिभाऊ घोगरे हायस्कूलच्या संकुलामध्ये स्व.भाई बळवंतराव बप्पा घोगरे यांची जयंती व जन्मशताब्दी कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सतीश पंढरीनाथ घोगरे तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक अनिल गव्हाणे यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात बप्पांच्या स्मृतीस्थळाच्या पूजनाने झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बप्पांच्या तसेच सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशालेचे मुख्याध्यापक टी. डी.कांबळे यांनी केले.

मान्यवरांच्या सत्कारानंतर संकुलातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमाणपत्र, ट्रॉफी व फुल देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी चौधरी सर, बारबोले सर, चिंटू पाटील तसेच एसबीआयच्या मॅनेजर वास्के मॅडम यांनी आपली मनोगते व्यक्त केली. मनोगतातून त्यांनी बप्पांच्या कार्याचा उलगडा केला प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन करताना सगुण निर्गुण एक गोविंद तु रे या अभंगानुसार बप्पा हे सगुन आणि निर्गुणाचे मिश्रण होते, असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी बप्पांच्या विचाराचा वारसा चालवावा असे आवाहन मान्यवरांनी केले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष पी.डी. घोगरे, उपाध्यक्ष महादेव गवाड, जनरल सेक्रेटरी अरुण घोगरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अल्लाउद्दीन शेख गुरुजी, चिंटू पाटील, केंद्रप्रमुख श्रीमती वाघमारे मॅडम, एसबीआयच्या मॅनेजर वास्के मॅडम, हरिश्चंद्र शिंदे, येडबा शितोळे, चौधरी सर, बारबोले सर, काका देशमुख, लिंबराज कांबळे अन्य संस्था पदाधिकारी व सदस्य, शिक्षक– शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ए.बी. क्षीरसागर यांनी केले.